# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.09.2025** **वारःमंगळवार**

---

- **उपराष्ट्रपतीपदासाठी आज निवडणूक - सी पी राधाकृष्णन आणि बी सुदर्शन रेड्डी यांच्यात लढत**

- **‘विकसित महाराष्ट्र व्हिजन 2047’ राज्याच्या विकासाचा वेग वाढवेल, मुख्यमंत्र्यांचा विश्वास**

- **नवीन नागपूर विकसित करण्यासाठी NMRDA आणि हुडको, NBCC यांच्यात करार. आणि**

- **ओबीसीवर अन्याय होऊ देणार नाही – महसूलमंत्री चंद्रशेखर बावननकुळे यांची ग्वाही**

आता सविस्तर बातम्या

**उपराष्ट्रपतीपदासाठी**

उपराष्ट्रपतीपदासाठी आज निवडणूक होणार आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार आणि महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची लढत इंडिया आघाडीचे उमेदवार आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश बी सुदर्शन रेड्डी यांच्याबरोबर होणार आहे. उपराष्ट्रपतीपदाची निवड ही संसदेच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांच्या गुप्त मतदानाद्वारे केली जाते. सध्या लोकसभेत 542 तर राज्यसभेत 239 सदस्य आहेत त्यामुळे एकंदर मतदारांची संख्या 781 असून निवडून येण्यासाठी 391 मतांची आवश्यकता आहे.

यावर्षी जुलै महिन्यात प्रकृतीच्या कारणास्तव जगदीप धनखड यांनी राजीनामा दिला होता त्यामुळे ही निवडणूक घेण्यात येत आहे. आज सकाळी 10 ते संध्याकाळी 5 या वेळेत मतदान होणार असून आजच संध्याकाळी सहा वाजता मतमोजणी होणार आहे.

**भाजपाकार्यशाळा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजे एनडीए सदस्यांच्या प्रशिक्षण कार्यशाळेच्या सांगता समारंभाला संबोधित केलं. आज होणाऱ्या उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठी मतदान प्रक्रियेचं मूलभूत प्रशिक्षण खासदारांना देण्यासाठी ह्या कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं होतं.

या कार्यशाळेत, मोदींनी एनडीएच्या सदस्यांना नवीन जीएसटी सुधारणांचे फायदे तसंच ऑनलाइन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन विधेयक,2025 यासह विविध महत्त्वाच्या कायद्यांबद्दल जनजागृती करण्याचं आवाहन केलं. स्वावलंबी भारत निर्माण करण्यासाठी एनडीएच्या खासदारांनी नेतृत्वाची भूमिका घ्यावी असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. यावेळी त्यांनी स्वदेशी उत्पादनांचा वापर आणि प्रचार करण्यावरही भर दिला.

## व्हिजन डॉक्युमेंट 2047

व्हिजन डॉक्युमेंट 2047 ही भविष्यासाठीची आपली मार्गदर्शक तत्वे आहेत. या व्हिजननुसार भविष्यातील राज्याची धोरणे तयार करावीत असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात विकसित महाराष्ट्र व्हिजन डॉक्युमेंट 2047 बाबत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली; त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव राजेश कुमार यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि सचिव उपस्थित होते. आपल्या धोरणांची आखणी ह्या व्हिजननुसार झाली पाहिजे. पुढील पाच वर्ष आपण सातत्यानं या व्हिजनवर काम केलं तर 2047 मध्ये विकसित महाराष्ट्राचे स्वप्न आपण नक्की पूर्ण करू, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. या बैठकीत पाणी, वीज, शिक्षण, सामाजिक कल्याण, उद्योग आणि सेवा, तंत्रज्ञान, अर्थकारण ह्यासह विविध विषयांवर सादरीकरण करण्यात आलं.

## वैनगंगा–नळगंगा

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाचं सादरीकरणही काल मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत करण्यात आलं. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाद्वारे विदर्भ आणि मराठवाडा विभागातील पाणीटंचाई दूर करण्याबरोबरच शेतीला शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे. या प्रकल्पाला गती देण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल 15 ऑक्टोबरपर्यंत शासनाकडे सादर करावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

## नवीन नागपूर

नवीन नागपूर विकसित करण्यासाठी NMRDA  अर्थात नागपूर महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण आणि हुडको, आणि NBCC म्हणजे नॅशनल बिल्डिंगज् कन्स्ट्रक्शन कॉरपोरेशन यांच्यात काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत करार करण्यात आला. या प्रकल्पाअंतर्गत  1 हजार 700 10 एकरमध्ये  नवीन नागपूर क्षेत्र विकसित होणार असून 148 किलो मीटरचा नागपूर बाह्य वळण रस्ता विकसित केला जाणार आहे. या रस्त्यामुळे वाहतूक नियोजन सुलभ होण्यास मदत होणार आहे.

**फिनिक्स-पुरस्कार**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना काल मराठी पत्रकार संघाच्या वतीनं फिनिक्स पुरस्कारानं गौरवण्यात आलं. मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान इथं आयोजित कार्यक्रमात श्री श्री रविशंकर यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. या पुरस्कारामुळे काम करण्यासाठी तसंच पदाची जबाबदारी सांभाळण्यासाठी दुप्पट बळ मिळल्याचं फडणवीस यांनी या पुरस्काराला उत्तर देताना सांगितलं.

हे प्रादेशिक बातमीपत्र आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन देण्यात येत आहे...

**जीएसटी-प्रतिक्रिया**

वस्तू आणि सेवा कर परिषदेनं कर रचनेत सुसूत्रता आणण्यासाठी

नुकतेच महत्त्वाचे बदल जाहीर केले. येत्या 22 तारखेपासून या सुधारणा लागू होणार आहेत. या निर्णयाचं विविध स्तरातून स्वागत होत आहे. जेष्ठ पत्रकार आणि आर्थिक घडामोडींचे अभ्यासक चंद्रशेखर पटवर्धन याबाबत आकाशवणीशी बोलताना म्हणाले ----------

बाईट – पटवर्धन

**<u>ईद</u>**

ईद-ए-मिलाद म्हणजे हजरत महंमद पैगंबर यांची जयंती काल ठीकठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली. यंदाचं वर्ष हे दीड हजारावं  जयंती वर्ष असल्यामुळे यावर्षी मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पैगंबर जयंती विसर्जन मिरवणूक संपल्यानंतर साजरी करण्याचा निर्णय कौतुकास्पद असल्याचे पुणे जिल्हयाचे सह पोलिस आयुक्त रंजन कुमार यांनी म्हटलं आहे.

पुण्यातील मुख्य मिरवणुकीची सुरुवात नाना पेठेतील मन्नूशाह मशिदीपासून झाली. महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटी आणि संलग्न संस्थाच्या वतीनं विद्यार्थ्यांच्या अभिवादन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आलं होतं. धुळे शहरात अनेक ठिकाणी रक्तदान शिबीर, आरोग्य शिबीर असे कार्यक्रम झाले. अहिल्यानगर इथं मिरवणुकीसाठी येणाऱ्या नागरिकांना पाण्यासह खाद्यपदार्थांची व्यवस्था करण्यात आली होती. नाशिक आणि नंदुरबार जिल्ह्यात जुलूस काढण्यात आले होते. अकोला शहरातील शाळा आणि महाविद्यालयांना काल सुट्टी जाहीर करण्यात आली होती.

**<u>ओबीसी</u>**

ओबीसी आरक्षणाबाबत सरकार ठाम असून ओबीसींच्या ताटातलं आरक्षण कुणाच्याही ताटात जाऊ दिलं जाणार नाही, असं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल नागपुरात सांगितलं. येत्या बुधवारी ओबीसी उपसमितीची बैठक होणार आहे. त्यात छगन भुजबळ, पंकजा मुंडे, यांच्यासह सहा-सात मंत्री सहभागी होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**ओबीसी**

दरम्यान मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारने काढलेल्या जीआरमुळे  ओबीसी समाजाचं नुकसान होणार आहे, असा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ओबीसी समाजाला पहिली लढाई न्यायालयीन पातळीवर तर दुसरी लढाई रस्त्यावर लढावी लागेल, यासाठी ओबीसी संघटनां तयार असल्याचं वडेट्टीवार यांनी सांगितलं.

**बंजारा-आरक्षण**

मराठा समाजाप्रमाणे बंजारा समाजासाठीही सरकारनं हैदराबाद गॅझेट लागू करावं आणि बंजारा समाजाचा अंतर्भाव अनुसूचित जमातीमध्ये करावा यासाठी महाराष्ट्रातील बंजारा समजानं आक्रमक भूमिका घेतल्याचं दिसून येत आहे. बीडमधील वडवणी तहसील कार्यालयावर मोर्चा काढत प्रशासनाला या संदर्भात काल एक निवेदन देण्यात आलं.

**एकलमहिला**

राज्यातील एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी कौशल्य विकास, बचत गटांचे सशक्तीकरण, गृहउद्योग प्रोत्साहन, आरोग्य आणि निवारा सुविधा असे विविध उपक्रम राबविणार असल्याचे महिला आणि बाल विकास राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितलं आहे. यासाठी शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सामाजिक बांधिलकी भागीदार यांच्यामार्फत एकात्मिक धोरणात्मक कृती आराखडा तयार करण्यात येईल, तसंच तालुका आणि जिल्हा स्तरावर कृतीगट देखील स्थापन करण्यात येणार आहेत. परभणी जिल्ह्यातील ग्रामपंचायत स्तरावर पहिलं सर्वेक्षण पूर्ण झालं असून नगरपंचायत, नगरपालिका आणि महापालिका क्षेत्रातील सर्वेक्षण लवकरच होणार असल्याची माहिती बोर्डीकर यांनी दिली.

**बांबू**

बांबू हा उत्पन्नाचा उत्तम स्रोत असल्याने कोकणातील शेतकऱ्यांनी बांबू लागवडीकडे वळायला हवं, असं प्रतिपादन राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी काल रत्नागिरीत केलं. जिल्हास्तरीय बांबू लागवड आणि विकास परिषदेत ते बोलत होते.

**प्रियंकाखोत**

कोल्हापूर जिल्ह्यातील तारदाळ इथल्या वीरपत्नी प्रियांका निलेश खोत यांची सैन्य दलात लेफ्टनंटपदी नियुक्ती झाली आहे. तीन वर्षांपूर्वी त्यांच्या पतीचं सैन्य दलात कार्यरत असताना हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झालं होतं. प्रियांका खोत यांच्या या अभिमानास्पद कामगिरीनंतर तारदाळ गावच्या ग्रामस्थांनी मिरवणूक काढत त्यांचा सन्मान केला.

**हवामान**

विदर्भात आज बऱ्याच ठिकाणी तर कोकणात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.  मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

उपराष्ट्रपतीपदासाठी आज निवडणूक - सी पी राधाकृष्णन आणि बी सुदर्शन रेड्डी यांच्यात लढत

‘विकसित महाराष्ट्र व्हिजन 2047’ राज्याच्या विकासाचा वेग वाढवेल, मुख्यमंत्र्यांचा विश्वास

नवीन नागपूर विकसित करण्यासाठी NMRDA आणि हुडको, NBCC यांच्यात करार.

आणि

ओबीसीवर अन्याय होऊ देणार नाही – महसूलमंत्री चंद्रशेखर बावननकुळे  यांची ग्वाही

# आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.